सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

▪ वर्ष : ६
▪ अंक : ४५
▪ पाने : ८
▪ पुणे

संपादक : घनश्याम पाटील

मूल्य ₹३

www.chaprak.com

सस्नेह निमंत्रण

**चपराक साहित्य महोत्सव २०१७**

- एकाचवेळी अनेक पुस्तकांचे प्रकाशन
- सुप्रसिद्ध पत्रकार भाऊ तोरसेकर यांची मुलाखत (संवादक – हरिश केंची आणि आबा माळकर)
- 'चपराक प्रकाशन'तर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय दिवाळी विशेषांक स्पर्धेचे पुरस्कार वितरण
- सागर कळसाईत लिखित 'कॉलेज गेट' कादंबरीतील एका प्रकरणाचे अभिवाचन
- निमंत्रित कवींची बहारदार काव्यमैफल

**वेळ :** गुरुवार दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी दुपारी २ ते रात्री ९ पर्यंत

**ठिकाण :** श्रमिक पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे

▪ सोमवार दि. ०५ ते ११ डिसेंबर २०१६ ▪ RNI No. MAHMAR/2011/35979 ▪ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

▪ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ▪ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 05/12/2016

# वाल्याचा वाल्मिकी होईल का?



**राम** गणेश गडकरी यांच्याकडे एकदा काही कार्यकर्ते गेले. त्यांनी सांगितले की, ''आम्ही सर्वांनी एकत्र येऊन एक संस्था स्थापन केलीय. तिच्या शुभारंभाचा नारळ तुमच्या हस्ते फोडावा अशी आमची सर्वांची इच्छा आहे...''

त्यावर गडकरी म्हणाले, ''मी संस्थेचा नारळ फोडतो; संस्था कधी फुटणार हेही सांगा....''

यातला विनोदाचा भाग सोडला तर मराठी माणसे फार काळ एकत्र राहू शकत नाहीत, संघटीतपणे काम करू शकत नाहीत असाच अनुभव आजही येतो.

गडकरींचा हा किस्सा आठवण्याचे कारण म्हणजे सध्याचे आपल्या राज्यातील असलेले राजकारण! आजवर अनेक संस्था, संघटनांनी, राजकीय पक्षांनी येनकेन प्रकारे आपापल्या ध्येयधोरणानुसार काम करण्याचा प्रयत्न केला; मात्र ते संघटीत राहू शकत नाहीत असेच आजवर दिसून आले आहे.

महाराष्ट्रात बहुसंख्य असलेल्या मराठा समाजाची मोट बांधण्यासाठी काहींनी पुढाकार घेतला. मराठा समाजावर होणारे अत्याचार, त्यांची होणारी पिळवणूक, ॲट्रोसिटी कायद्याचा होणारा गैरवापर या सर्वांविषयी एक खदखद होती. कोपर्डीतील एका निष्पाप मुलीवरील अत्याचारानंतर हा रोष अधिक प्रमाणात वाढला आणि सर्वत्र क्रोधाच्या ज्वाळा निर्माण झाल्या. यात मराठा समाज शांतीच्या मार्गाने रस्त्यावर उतरला. त्यांनी सर्वत्र लाखोंचे मूक मोर्चे काढले. व्यवस्थेविषयीचा निषेध नोंदवतानाच त्यांनी कुठेही हिंसाचार होणार नाही याची दक्षता घेतली. त्यामुळे मराठा समाजाची दखल मोठ्या प्रमाणात घेण्यात आली. प्रशासन आणि प्रसारमाध्यमे खडबडून जागी झाली.

समुद्र मंथनातून जसे अमृत बाहेर येते तसेच विषही येते. त्यातून काय घ्यायचे हा ज्याचा त्याचा अधिकार. मराठा मूक मोर्चातून या समाजाचे संघटन दिसले असले तरी त्यातून नेमके काय साध्य झाले हे पाहण्यासाठी थोडा वेळ जाऊ द्यावा लागेल. तूर्तास तर हातात काहीच आल्याचे दिसत नाही. उलटपक्षी मोदी सरकारच्या नोटा बंदीच्या निर्णयानंतर राज्यभर झालेल्या पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीत सेना–भाजपचाच जोर दिसून आला आहे. याचा अर्थ आजच्या सरकारविषयी सामान्य माणसाच्या मनात राग नाही असा तर निघतोच पण दुसरी वस्तुस्थितीही लक्षात घ्यायला हवी. ग्रामीण भागातील बहुसंख्य असलेला मराठा समाज आज काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेससोबत नाही तर सेना–भाजपसोबत आहे. म्हणजे ज्या भगव्या पताक्याची तथाकथित 'मराठा' संघटनांना 'ॲलर्जी' होती त्याच समाजातील बहुसंख्य लोक भगवी पताका श्रद्धेने खांद्यावर घेऊन नाचताना दिसत आहेत.

मराठा मूक मोर्चाचे अपत्य म्हणजे यातून 'संभाजी ब्रिगेड'सारख्या संघटनेने सक्रिय राजकारणात प्रवेश केला आहे. अर्थात यापूर्वीही ही संघटना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या राजकारण करायचीच; पण ते द्वेषाचे, सूडाचे राजकारण होते. या संघटनेचे सर्वेसर्वा पुरूषोत्तम खेडेकर यांच्या सौभाग्यवती रेखा खेडेकर या भाजपाच्याच आमदार होत्या. हेच स्वयंघोषीत शिवश्री (नव्हे शिवीश्री) केवळ ब्राह्मण द्वेषाने पेटलेले होते. अगदी ब्राह्मणांना कापा, मारा, त्यांच्या बायका पळवून आणा इतके सांगण्यापर्यंत आणि लिहिण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. त्यांनी त्यांचे हे 'दिव्य' विचार त्यांच्याच घरी त्यांच्या बायकोला आणि आईला सांगावेत, त्या दोघीही त्यांच्या तोंडावर थुंकल्याशिवाय राहणार नाहीत, असे आम्ही यापूर्वीच निक्षून सांगितले होते. आता राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली या शिवीश्रींना अटक होण्याची शक्यता असतानाच मराठा मूक मोर्चाला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून या संघटनेने राजकारणात उडी मारली आहे.

राज्यातील महत्त्वाच्या महानगरपालिकांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असतानाच मराठा समाजाला एकत्र करण्याच्या नावावर हा पक्ष उभा राहत आहे. त्याचे भवितव्य काय असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही; मात्र त्यांनी द्वेषाचे राजकारण सोडले, हिंदुत्वाचा विरोध कमी केला, समाजहिताचे चार निर्णय घेतले तर त्यांना किमान श्वास घेता येईल. पुण्या–मुंबईसारख्या

**संपादकीय**
घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२

महानगरात इच्छुक उमेदवारांची साठमारी सुरू असताना त्यातील काही अतृप्तांना ही संघटना (किंवा फार तर नवा पक्ष म्हणूया) सामावून घेऊ शकेल. स्थानिक समीकरणे पाहता त्यातील काही उमेदवार निवडून येतीलही! पण ब्रिगेडची विचारधारा किंवा ध्येयनिष्ठा असले काही प्रकार त्यांच्याकडे नसतील. निवडून आल्यानंतर तू तुझ्या मार्गाने आणि मी माझ्या मार्गाने असेच चित्र बहुतेक ठिकाणी दिसेल. 'संभाजी ब्रिगेड'ची ध्येयधोरणे पाहून आणि त्यांच्या सूडाच्या राजकारणावर फिदा होऊन कोणी त्यांच्याकडे आकर्षित होईल असे वाटत नाही. केवळ अपरिहार्यता किंवा तात्कालिक तडजोड म्हणून काहीजण त्यांना साथसंगत करतील. हे चांगले की वाईट हे ज्याने त्याने ठरवावे.

नरेंद्र मोदी यांच्या रूपाने देशाला एक कणखर आणि सत्याची चाड असणारे पंतप्रधान लाभले आहेत. ते धाडसाने निर्णय घेत आहेत. अगदी शत्रूच्या गोटात जाऊन त्यांना मारणे असेल किंवा अंतर्गत साफसफाईसाठी एका रात्रीत नोटाबंदीचा निर्णय घेणे असेल, त्यांच्या प्रत्येक भूमिकेतून त्यांचा कणखरपणा आणि स्वाभिमानी बाणा दिसून येतो. किंबहुना 'मोदी म्हणजे भाजप नाही' हेही आता आपल्याला समजून घ्यावे लागेल. त्यांची भूमिका कुण्या एका पक्षासाठी नसून ती देशहिताची आहे, यावरचा सामान्य माणसाचा विश्वासही अधिक दृढ होत चालला आहे. एका नव्या राजकीय पर्वाची नांदी झालेली असताना देशभरातील त्यांचे विरोधक पुरते भुईसपाट झाले आहेत. काँग्रेस असेल किंवा इतर प्रादेशिक पक्ष असतील; प्रत्येकांना त्यांनी लोळवले आहे. लोक उत्स्फूर्तपणे त्यांच्या पाठिशी असल्याचे चित्र देशभर आहे.

या अशा साऱ्या वातावरणात संभाजी ब्रिगेड राजकीय पक्ष म्हणून पुढे येत असेल तर त्यांच्यापुढे निश्चितच मोठे आव्हान आहे. ऑल इंडिया मुस्लिम लिग असेल किंवा शिवसेनेसारखे मराठमोळे पक्ष असतील तेही अशाच कट्टरतावादातून पुढे आले आहेत; मात्र त्यांनी त्यांचा कट्टरपणा, कडवटपणा दूर सारत लोकहिताचे निर्णय घेतल्याने त्यांना बऱ्यापैकी मान्यता मिळाली आहे. संभाजी ब्रिगेडनेही त्यांची संकुचित वृत्ती आणि द्वेष बाजूला सारला तर त्यांना एक संधी उपलब्ध होऊ शकते. बहुसंख्य असलेला मराठा त्यांच्या पाठिशी राहील अशी मुळीच शक्यता नसली तरी जे कोणी हतबलतेने किंवा पर्यायाअभावी त्यांच्याकडे आकर्षित होतील त्यांच्याकडून जनहिताची कामे करून घेतली, वैचारिक संघर्ष उभारला तर वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो. संभाजी ब्रिगेडसाठी समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याची ही संधी आहे. ते कात टाकून सकारात्मक राजकारण करतील की विषाचे फुत्कार सोडण्यातच धन्यता मानतील हे येणाऱ्या काळात कळेल. तूर्तास महाराष्ट्राच्या राजकारणात इतर अनेक छोट्या–मोठ्या पक्षाप्रमाणेच आणखी एका पक्षाची भर म्हणून त्यांना शुभेच्छा देऊयात!!



# जागवलेला सुप्त लढवय्या

**कुठे** भूकंप झाला किंवा महापूर आल्यावर सामान्य माणसाच्या आयुष्यात त्याने मोठ्या कष्टाने जमा केलेला संसार उद्ध्वस्त होऊन जात असतो. सर्व जीवनच अस्ताव्यस्त होऊन जात असते. कोणी मदतीला येण्याइतकाही भक्कम माणूस आसपास नसतो. अशावेळी त्या आपत्तीतून जे बचावलेले असतात, तेच आपल्या परीने जवळपास विखरून पडलेले जग सावरण्यासाठी पुढे येत असतात. आपली स्थिती थोडी बरी असलेला माणूस आपल्याहून अधिक संकटात असलेल्याच्या मदतीला धावून जातो. कारण तेव्हा त्याला आपला भवताल सुरक्षित पुन्हा उभारण्याची गरज खर्‍या अर्थाने उमजलेली असते. क्षणार्धात सर्व काही होत्याचे नव्हते झाले, मग आधी गरजवंताला जगवणे सावरणे हे प्रत्येकाचे कर्तव्य होऊन जाते. अशी माणसे स्वत:ला समाज म्हणत असतात. ती माणसे ज्या पद्धतीने जीवनाची घडी नव्याने बसवण्याचा प्रयास सुरू करतात, त्याला युद्धपातळीवरचे काम मानले जाते. कारण काय बिघडले वा कुणाचे चुकले, असे वाद घालायला सवड नसते. उत्तराखंडात ढगफुटीने लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले, तेव्हा प्रथम मदतीला धावले तेही विखुरलेले सामान्य लोक होते आणि त्यांच्यापाशीही कुठली खास साधने नव्हती. त्यांनी कुठल्या तक्रारी केल्या नाहीत वा एकमेकांवर दोषारोप ठेवले नव्हते. तीच कहाणी बारा वर्षापूर्वी मुंबई अतिवृष्टीने बुडाली तेव्हाची होती. तुंबलेल्या पाण्याने मुंबईला घुसमटून टाकलेले होते. अशावेळी जे कोणी सुखरूप घरात होते, त्यांनीच रस्त्यावरच्या वा ग्रासलेल्यांसाठी प्राथमिक सहाय्याचा प्रयत्न सुरू केला होता. हे कुठल्याही समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असते; पण असे अनुभव मर्यादित स्वरूपाचे असतात. स्थानिक पातळीवरचे असतात. नोटाबंदीने संपूर्ण देशातील जनजीवन विस्कळीत केले होते. त्यातून देश कसा सावरू शकेल, याचा सरकारने विचारच केला नसेल काय?

नरेंद्र मोदी आज देशाचे पंतप्रधान आहेत आणि त्यांना निवडणुकीच्या राजकारणात एका नैसर्गिक आपत्तीनेच आणले, याची कोणाला आठवण राहिलेली नाही. २००१ च्या आरंभी प्रजासत्ताकदिनी गुजरातमध्ये जो भयंकर भूकंप झालेला होता. त्याच्या निमित्ताने जे काहूर माजवण्यात आले, त्यात मुख्यमंत्री केशूभाई पटेल यांना सत्ता सोडावी लागली होती. त्यांच्या जागी नरेंद्र मोदी यांची झालेली निवड अनेकांना चकीत करून गेली होती. कारण हा माणूस सातत्याने संघटनेत काम करीत राहिला होता आणि त्याने कधीही कुठली निवडणूक लढवलेली नव्हती. प्रशासकीय अधिकारपदही उपभोगलेले नव्हते. त्यामुळेच अनुभवशून्य मोदी काय करणार; अशीच सर्वांना शंका येणे स्वाभाविक होते; पण पुढल्या काळात त्यांनी त्याच भूकंपाच्या पुनर्वसनाच्या केलेल्या कामामुळे त्यांची ख्याती झाली. गुजरात दंगलीचे खापर मोदींच्या डोक्यावर फोडणार्‍यांनी कधी मोदींच्या आपत्ती व्यवस्थापनातील कर्तबगारीची जगाला ओळख होऊ दिली नाही; पण याच विषयात काम करणार्‍या जगातल्या संघटनांनी मोदींच्या त्या गुणवत्तेची दखल घेतली होती. राष्ट्रसंघाने तर जगातले सर्वोत्तम आपत्ती व्यवस्थापन, असा गुजरात सरकारचा गुणगौरव केलेला होता. मग मोदींनी कुठल्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये गुजरातच्या जनतेला त्वरेने संकटातून दिलासा देण्याची काळजी घेतलेली होती. अगदी उत्तराखंडात ढगफुटी झाल्यावर गुजरातचे कोणी पर्यटक तिथे अडकले असतील, तर त्यांच्या सुटकेसाठी त्यांनी आपल्या राज्यातील यंत्रणेला तिथे आणून कामाला जुंपलेले होते. हा संदर्भ एवढ्यासाठी सांगायचा, की असा माणूस आज देशाचा पंतप्रधान असताना, त्याने नोटाबंदीतून देशाच्या जनजीवनात निर्माण होणारी आपत्ती व परिणामांचा कुठलाही विचार केलेला नसेल काय? अशा निर्णयाने जे संकट उभे राहील, त्यातून जनतेला किमान त्रास होण्याचा विचारच केलेला नसेल काय?



भाऊ तोरसेकर
९७०२१३४६२४

उत्तम आपत्ती व्यवस्थापन उभे करताना एकटा मोदी नावाचा एक माणूस चमत्कार घडवू शकत नाही. उत्तराखंडातील गुजराती पर्यटकांना वेगाने बाहेर काढण्यासाठी मोदींनी जे काम केले, त्याची रॅम्बो म्हणून तेव्हा टवाळी करण्यात माध्यमांनी पुढाकार घेतला होता; पण प्रत्यक्षात मोदी वा त्यांच्या गुजराती यंत्रणेने काय केले, त्याचा तपशील कुठे आलेला नव्हता. ती यंत्रणा काय आहे, त्याचीही माहिती जगाला सांगावी असे कुणा पत्रकार माध्यमांना वाटलेले नव्हते. अशा मानसिकतेत वावरणार्‍या माध्यमाकडून, आजच्या नोटाबंदीविषयी काही सकारात्मक माहिती समोर येण्याची शक्यता म्हणूनच जवळपास नगण्य आहे. पहिली गोष्ट म्हणजे कुठल्याही तयारीशिवाय मोदींनी हे नको इतके मोठे धाडस केल्याचा आरोप आहे. त्यातले तथ्य काय आहे? एकूण चलनातील ८६ टक्के नोटा रद्द करणे, हे धाडस होते यात शंका नाही. कारण एक-दोन दिवसात इतके चलन बदलून देणे निव्वळ अशक्य होते; पण गोपनीयतेसाठी तितका धोका पत्करणे भाग होते. या निर्णयाने आठवडाभर पन्नास कोटी जनतेची तारांबळ उडणार आणि निदान दोन महिने लोकांचे जनजीवन अस्ताव्यस्त होणार; हे लक्षात येण्यासाठी मोठा व्यवस्थापकीय अनुभव गाठिशी असण्याचे कारण नाही; पण ज्या यंत्रणेवर मोदींनी विश्वास दाखवला, त्या भारतीय बँकींग यंत्रणेपाशी खरेच इतकी कार्यतत्परता होती काय? नेहमीच्या उलाढालीत ज्या बँकांवर शिव्याशापांचा वर्षाव होत असतो, त्यांच्याकडून बारा-चौदा तास सलग काही दिवस काम होण्याची अपेक्षा सोपी नव्हती; पण गेल्या तीन आठवड्यात राष्ट्रीय बँकांनी बजावलेली कामगिरी, खरेच थक्क करून सोडणारी आहे. ह्या निमित्ताने भारतीय बँक कर्मचारी इतक्या अफाट क्षमतेने काम करू शकतात, हा देशाला घडलेला अपूर्व साक्षात्कार आहे; पण त्याहीपेक्षा त्यांच्यावर मोदींनी दाखवलेला विश्वास चकीत करणारा आहे.

हे एकप्रकारचे युद्ध होते आणि त्यातला खरा लढवय्या सैनिक, त्या त्या बँक शाखेतला कर्मचारीच होता. त्यालाही हे इतके मोठे युद्ध आपण लढायचे आहे, त्याविषयी काडीची कल्पना ८ नोव्हेंबरच्या रात्रीपर्यंत नव्हती; पण जेव्हा ही घोषणा पंतप्रधानांनी केली, तेव्हा त्यातली जबाबदारी ओळखून प्रत्येक बँकेतील कर्मचार्‍याने कुठल्याही तक्रारी केल्याशिवाय कर्तव्य म्हणून कष्ट उपसलेले आहेत. काळवेळ, तास-दिवस याचाही विचार न करता, अथक या कर्मचार्‍यांनी केलेल्या कामासाठी कोणी त्यांची पाठ थोपटलेली नाही. काहीप्रसंगी सामान्य ग्राहक नागरिकांच्या शिव्याशाप ऐकून घेत, नोटाबदलीपासून नवी खाती उघडण्यापर्यंत या कर्मचार्‍यांनी उपसलेले कष्ट, त्यांच्याही आयुष्यात त्यांनी यापूर्वी कधी काढलेले नाहीत. बँकेतील नोकरी म्हणजे बिनकष्टाची, सुखवस्तू जीवन अशी समजूत आहे; पण गेल्या तीन-चार आठवड्यात महायुद्ध लढल्यासारखी ही लढाई त्या कर्मचार्‍यांनी चालवली आहे. कधी पगारवाढ, बोनस वा विविध सवलतीसाठी अनेक दिवस काम बंद ठेवणार्‍या, अशा समाजघटकाकडून कोणी इतक्या अपार सामर्थ्याची वा कर्तृत्वाची कधी अपेक्षा केली होती काय? भारतातल्या अशा पांढरपेशा कर्मचार्‍यांच्या सुखवस्तूपणावर नेहमी टिका होत राहिली; पण प्रसंग आला, तेव्हा त्यांच्यातला लढवय्या जागला आणि त्याने पंतप्रधानाच्या विश्वासाला प्रतिसाद दिला, हे कोणी कधी लक्षात घ्यायचे? आणखी एक-दोन वर्षांनी नोटबंदी ही दंतकथा होऊन जाईल आणि त्यात नरेंद्र मोदी व त्यांच्या सरकारची नोंद इतिहास घेईल. किती काळा पैसा बाहेर आला वा कोणते आर्थिक लाभ देशाला मिळाले, त्याचाही उहापोह होऊ शकेल; पण लाखो बँक कर्मचारी युद्धपातळीवर काम करू शकतात, ह्याची नोंद होण्याची शक्यता कमी आहे. पंतप्रधानांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाची व कर्मचार्‍यांनी तो विश्वास सार्थ ठरवल्याचे कोणाच्या लक्षात आजही आलेले नाही. मोदींचे कौतुक इतकेच, की त्यांनी आळशी मानल्या जाणार्‍या या बँक कर्मचार्‍यांना त्यांच्यात दडलेल्या कर्तृत्वाचा जिताजागता साक्षात्कार घडवला आहे. अर्थात ही सकारात्मक बाजू आपल्या माध्यमांना दिसणार नाही.



# आसरा

## एका सामाजिक कार्यकर्त्याचा पडद्यावरचा प्रवास

**'पुण्यातील** एक झोपडपट्टी. त्या जागेचा मूळ मालकिणीकडून ताबा घेण्याचा प्रयत्न त्यामुळे प्रकरण कोर्टात. त्यातच मालकिणीकडून जागेसाठी राजकीय गुंडांची मदत घेण्याचा प्रयत्न. निकालविरुद्ध केला तर रहायचे कोठे? या प्रश्नामुळे झोपडपट्टीतील तमाम रहिवासी हवालदिल; परंतु झोपडपट्टीवासियांचा हितासाठी सामाजिक कार्याचे व्रत घेतलेला एक सामाजिक कार्यकर्ता स्वतःहून पुढाकार घेतो आणि या झोपडपट्टीतील नागरिकांना 'झोपु' योजनेतंर्गत पक्की घरे मिळवून देतो आणि त्यांचे जीवनमान उंचावतो' एका सत्य घटनेवर आधारित असलेल्या या सामाजिक कार्यकर्त्याचा हा सर्व प्रवास 'आसरा' या नवीन हिंदी चित्रपटाद्वारे पडद्यावर दाखविण्यात आला आहे.



हे सामाजिक कार्यकर्ते आहेत पुण्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सर्वपरिचित असलेले सदानंद शेट्टी. चित्रपटाचे निर्माते असलेले शेट्टी यांनी स्वतःचं चित्रपटात मुख्य भूमिका केली आहे. त्यामुळे चित्रपटाचा हेतू स्पष्ट असला तरी त्यांचे हे सामाजिक कार्य चित्रपटाच्या माध्यमातून दाखविण्याचा दिग्दर्शकाचा प्रयत्न बऱ्यापैकी यशस्वी झाला आहे. अतुल कुलकर्णी, अशोक समर्थ, रघुवीर यादव, सुनील पाल, 'पिपली लाईव्ह' फेम ओंकारदास माणिकपुरी, किशोरी बल्लाळ या चित्रपटातील इतर प्रसिद्ध कलाकारांनीही त्याला मोठा हातभार लावला आहे. त्यामुळेच चित्रपट रंजक आणि सुसह्य होण्यास मदत झाली आहे. अर्थात 'लावणी नृत्य', 'गणपतीवरचे गाणे' हा इतर अनुषंगिक मसाला चित्रपटात आहेच.

मुख्य म्हणजे झोपडपट्टीतील रहिवाशांचे जीवन आणि त्यानंतर चांगली घरे मिळाल्यानंतरही त्यांची न बदलणारी मनोवृत्ती यावर चित्रपटात चांगला प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. यावरून कोणतेही सामाजिक कार्य करणे किती अवघड आहे याचेही प्रत्यंतर आल्याशिवाय राहत नाही. अर्थात तो एका सामाजिक कार्यकर्त्याचा प्रवास आहे त्यामुळे त्याला विशिष्ट चौकट आहे. या चौकटीतूनच मुख्य नायकाच्या भूमिकेसाठी हा चित्रपट पाहावा लागत असल्याने त्याला अखेर मर्यादा येते; मात्र त्यातल्या त्यात चित्रपट रंजक होण्याच्या दृष्टीने लेखक-दिग्दर्शक राज सागर यांनी केलेले प्रयत्न दिसून येतात. छायांकनाचाही त्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. ▪▪

चित्रांगण
श्रीकांत श्री. कुलकर्णी
९८२२३१९४४३

# 'किंगफिशर कॅलेंडर गर्ल' सोनाली मराठीत



**'किंगफिशर** कॅलेंडर गर्ल' बनलेल्या अनेक बिनधास्त, बेधडक मॉडेल्सनी आज फॅशन इंडस्ट्रीमध्ये व बॉलिवूडमध्ये आपली मोहोर उमटवली आहे. विशेषतः बॉलिवूडमध्ये एंट्री करण्यासाठी 'किंगफिशर कॅलेंडर गर्ल' हे एक उत्कृष्ट व्यासपीठ मानले जाते. बॉलिवूडमध्ये आपला जलवा दाखवल्यानंतर किंगफिशरची मराठमोळी कॅलेंडर गर्ल सोनाली राऊत आता मराठी सिनेमात येण्यासाठी सज्ज झाली आहे.

सोनालीने 'किंगफिशर कॅलेंडर गर्ल' स्पर्धा जिंकली आणि बॉलीवूडचे दरवाजे तिच्यासाठी खुले झाले. सर्वप्रथम हिमेश रेशमियाच्या 'द एक्सपोज' मधून झळकलेल्या सोनालीने या चित्रपटात नकारात्मक भूमिका रंगविली होती. रणवीरसोबत एका जाहिरातीसाठी तिने केलेलं एक हॉट फोटोशूट खूपच चर्चेत राहिलं. त्याचबरोबर 'ग्रेट ग्रॅण्ड मस्ती' या चित्रपटातील 'लिपस्टिक लगाके' हे सोनालीवर चित्रित झालेलं गाणं तिच्या बिनधास्त अदांनी चांगलंच गाजलं. सोनाली 'बिग बॉस ८' तसेच 'झलक दिखला जा सीझन ९' मध्ये स्पर्धक म्हणून झळकली होती.

आगामी 'हिरो' या मराठी चित्रपटालं एक धमाकेदार आयटम साँग सोनालीवर लवकरच चित्रित होणार आहे आणि त्या निमित्ताने किंगफिशरचं ग्लॅमर मराठी पडद्यावर प्रथमच पहायला मिळणार आहे. ▪▪

# 'भय'

## १६ डिसेंबर पासून प्रदर्शित

**वेगवेगळ्या** धाटणीचे चित्रपट सध्या मराठीत येऊ घातले असून प्रेक्षकवर्गाकडूनही वेगळ्या पठडीतल्या चित्रपटांच चांगलं स्वागत होत आहे. असाच वेगळ्या आशयाचा ५ जी इंटरनॅशनल प्रस्तुत व सचिन कटारनवरे निर्मित 'भय' हा चित्रपट १६ डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वेगळ्या धाटणीच्या या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची व संकलनाची जबाबदारी राहुल भातणकर यांनी सांभाळली आहे.

चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने पुण्यात नुकताच 'भय'च्या टीमने पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते सचिन कटारनवरे, सहनिर्माते अजय जोशी, दिग्दर्शक राहुल भातणकर, लेखक नितीन सुपेकर आणि चित्रपटाचे प्रमुख कलावंत अभिजीत खांडकेकर आणि स्मिता गोंदकर उपस्थित होते.

माणसाचे मन ही मोठी अजब गोष्ट आहे. मनाचे भाव, भावना आणि माणसाचे वर्तन यातल्या फार कमी गोष्टींचा विज्ञानाला उलगडा झाला आहे. भीती ही प्रत्येकाच्या मनात असते. ही भीती कशाचीही असू शकते. उंचीची, गर्दीची, एकटेपणाची अगदी कशाचीही भीती एखाद्याला सतावत असते. ह्या भीतीवर मात न करता येणाऱ्या व्यक्तीची काय अवस्था होत असेल? भीती मनात ठेऊन जगणाऱ्या व्यक्तींना काय अडचणींना तोंड द्यावे लागते याचा गुंगवून टाकणारा प्रवास म्हणजे... भय हा चित्रपट आहे असे लेखक नितीन सुपेकर यांनी सांगितले.

वेगळा विषय, खिळवून ठेवणारं कथानक यासोबतच भय चित्रपटाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे दुबईच्या नयनरम्य लोकेशन्सवर चित्रीत करण्यात आलेल्या यातील दोन गाण्यांद्वारे दुबईतील गगनचुंबी इमारती, अलिशान क्रुझ, हेलिपॅडवरील दृश्ये तसेच प्रसिद्ध बीचेसची अनोखी सफर घडते. अभिजीत खांडकेकर, उदय टिकेकर, सतीश राजवाडे, स्मिता गोंदकर, संस्कृती बालगुडे, विनीत शर्मा, सिद्धार्थ बोडके, शेखर शुक्ला, नुपूर दुधवाडकर, धनंजय मांद्रेकर यांचा अभिनय भय चित्रपटात प्रेक्षकांना पहायला मिळेल. शेखर अस्तित्व यांनी लिहिलेल्या तीन वेगवेगळ्या जॉनरच्या गीतांना विक्रम मॉंटोरोज याचं संगीत लाभलं आहे. गायक तुलिका उपाध्याय, ब्रिजेश शांडिल्य, अली असलम यांच्या सुमधुर आवाजात ही गीते स्वरबद्ध केली आहेत.

या चित्रपटाचे सहनिर्माते अजय जोशी असून आशिष चौहान कार्यकारी निर्माता आहेत. सहकारी निर्माते अनिल साबळे आहेत. या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद नितीन विजय सुपेकर यांचे आहेत. कलादिग्दर्शन प्रशांत राणे यांचं आहे. नृत्यदिग्दर्शक अजय देवरुखकर असून छायांकन राजेश राठोर यांनी केले आहे. दमदार कथानक, श्रवणीय संगीत आणि त्याला कल्पक दिग्दर्शनाची जोड यामुळे 'भय' हा चित्रपट रसिकांसाठी एक वेगळा अनुभव ठरणार आहे. तामिळ, तेलगु, अरेबिक या तीनही भाषेतही भय प्रदर्शित केला जाणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले. ▪▪



## स्त्रीजीवनाचा संयत विद्रोह

# आभाळ अंतरीचे

***कवयित्री*** विद्याताई बयास ठाकूर यांच्या 'आभाळ अंतरीचे' या कवितासंग्रहास नुकतेच 'साहित्य साधना' पुरस्काराने गौरविण्यात आले. हा कवितासंग्रह 'निर्मल प्रकाशन', नांदेड यांनी प्रकाशित केला आहे. ताईंचा हा पहिलाच कवितासंग्रह आहे; पण कविता खूप प्रगल्भ आहेत. कविता ह्या संवेदनांचं मूर्त स्वरूप असतात. संवेदनशील मनातूनच उत्स्फूर्त कविता प्रकटतात याची अनुभूती या कविता वाचताना खूप प्रकर्षाने येते. कवितासंग्रहात एकूण एकोणसाठ कविता आहेत. साऱ्याच कविता वाचकाला अंर्तमुख करायला लावणाऱ्या आहेत.

**मी एक फिनिक्स राखेआड दडलेला**
**कितीही गाडलं तरी पुन्हा पुन्हा उडणारा**

ह्या पहिल्याच कवितेच्या ओळी समस्त स्त्रीजीवनाचा आशावाद प्रकट करणाऱ्या आहेत. स्त्री ही आदिम काळापासून व्यक्त होण्यासाठी धडपडत आली आहे आणि तिची व्यक्त होण्याची ताकद प्रचंड मोठी आहे. अगदी वेदकाळातील गार्गी, लोपामुद्रा या स्त्रियांच्या लिहिलेल्या ऋचा आपल्या वेदात आहेत. हा लिहिण्याचा वारसा आम्ही पुढे चालवत आहोत, तीच उर्मी समस्त स्त्रीवर्गात आहे हेच इथे कवियित्रीला सांगायचं आहे असं मला वाटतं.

**कोणत्या खुळ्या कल्पनांनी**
**तुझी केली मती गुंग?**
**एकदाच येऊ दे जगी**
**फेडीन मी सारे पांग**

स्त्री जन्माविषयी समाजात खूप खुळ्या कल्पना आहेत. मुलीच्या लग्नाच्यावेळी हुंडा द्यावा लागतो. त्यात वडिलांचे दिवाळे निघते. बरं एवढं सगळं करूनही मुलीला सुखी ठेवणारं घर, घरातली माणसं मिळतीलच असं नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती पण आता समाजातील चित्र बदलते आहे. मुली स्वकर्तृत्वाने स्वतःला सिद्ध करत आहेत. तरीही स्त्री जन्माचे स्वागत होत नाही तेव्हा ते व्हावं म्हणून हा विश्वास एक गर्भातील स्त्री जीव आपल्या आईला देतो आहे. खरंतर हा विश्वास देऊनही नव्हे सिद्ध करूनही लोक स्त्री जन्माचे स्वागत का करत नसतील? मुलगा घराचा कुलदीपक तर मुलगी पणती असते. मग मुलगाच हवा हा हट्ट का धरला जातो? आज समाजात असे चित्र आहे की लाडका मुलगा वृद्धापकाळी आईवडिलांची हेळसांड करतो; पण तेव्हा नकोशी वाटणारी मुलगीच आज त्यांचा आधार होते. साऱ्याच क्षेत्रात मुलगी आज आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर ती विराजमान झाली आहे. तेव्हा मीही अशीच मोठी होईन व तुमचे पांग फेडीन पण मला जन्माला येऊ द्या अशी आर्त हाक गर्भातील स्त्री जीव देतो आहे. ही कविता वाचून डोळे पाणावले.

पुढची कविता 'कब्जा' नावाची आहे. त्यातला आशय हा अध्यात्मिक असा आहे. ही कविता मला संत मिराबाईंची आठवण करून देते. आपली संत महात्मे पांडुरंगाच्या भेटीसाठी जसे आतूर असतात तसेच कवयित्री त्या




सर्वेश्वराला शरण जातात आणि त्याचा कब्जा मान्य करतात. त्या तिथे त्यांचा बुद्धिवाद बाजूला सारतात. ही कविता खूप भावली.

**बरं वाटतं जावई जेव्हा**
**मम्मी अशी हाक सासूबाईला मारतात**
**इकडे लेकाची वाट न्याहाळता न्याहाळता**
**आईचे मात्र डोळे थकतात**

ह्या ओळी अपेक्षाभंग या कवितेतल्या आहेत. आज समाजात मुलापेक्षा जावई जास्त जपतो. ज्या मुलांसाठी नवस-सायास केलेले असतात तो पत्नीचा भक्त झालेला असतो. ज्यांच्यासाठी जीव तुटतो तो कधीच आपल्या आईवडिलांना समजून घेत नाही. या मोठ्या समस्येला कवयित्रीने वाचा फोडली आहे. 'नटसम्राट' हे नाटक डोळ्यासमोर उभे राहते ही कविता वाचताना.

अनुत्तरित प्रश्न या कवितेतील आशय हा स्त्री-पुरुष समानतेचा आहे. सृष्टीत स्त्री आणि पुरुष हे एका रथाची दोन चाके आहेत. तिला वगळून आपण कशी प्रगती करणार? तिच्या हृदयातही एक स्वतंत्र आत्मा असतो. त्याचा विचार आपण कधी करणार? असा सवाल कवयित्रीने उपस्थित केला आहे. त्या अत्यंत प्रखरपणे म्हणतात

**एखादी स्त्री मक्त होताना**
**समाज इतका का अस्वस्थ होतो?**
**बाईच्या देहात सुद्धा**
**एक स्वतंत्र आत्मा वसतो**

'मित्र' ही कविताही अत्यंत बोलकी आहे. आपण सारे समाजशील आहोत. समाजात वावरत असतात आपल्याला अनेक नाती निर्माण करावी लागतात. आपण मैत्रीच नातं हे निर्मळ व निष्कपट निर्माण करत असतो. मित्रांमुळे जगण्याला बळ प्राप्त होते हेच कवयित्री अत्यंत नम्रतेने विशद करतात. नव्हे मैत्री मिळण्यासाठी ईश्वराचा प्रेम प्रसाद असावा लागतो असं म्हणतात.

**मित्र मिळवण्यासाठी**
**मनाची माती ओली लागते**
**ईश्वराच्या प्रेम प्रसादानेच**
**जीवनात मैत्री लाभते**

'व्यथा' या कवितेतून घरंदाजपणा, प्रतिष्ठा, यांच्या नावाखाली उंबऱ्याआड आपलं संपूर्ण आयुष्य बंद करणाऱ्या अनेक स्त्रियांची दुःख चित्रित झालेली आहेत. या स्त्रिया आपलं संपूर्ण आयुष्य ज्यांच्यासाठी खर्च करतात त्याला याचं काहीच नसतं. हे दुःख खूप जिव्हारी लागणारं असतं. संवेदनशील कवयित्री हे फार नेमकेपणानं आपल्या कवितेत मांडतात. ही कविता वाचली की आपल्याला आपल्या घरातल्या राबणाऱ्या स्त्रियांची, त्यांच्या कामाची व त्यांच्या आपल्याकडून असणाऱ्या माफक अपेक्षांची नकळत जाणीव व्हायला लागते.

**कर्तृत्वानं सारं मिळेल**
**प्रेम मात्र मिळत नाही**
**दुःख भरलं एकाकी जीवन**
**काही केल्या सरत नाही**

या ओळी 'प्रेम' या कवितेतल्या आहेत. यात आज आपण कर्तृत्वाच्या पाठिशी धावण्यात प्रेमाला कसं पारखं होत आहोत याचं चित्रण केलेलं आहे. प्रेम ही खूप व्यापक परिभाषा आहे. इथं केवळ प्रियकर आणि प्रेयसी यांच्यापुरताच हा अर्थ अभिप्रेत नाही. कर्तृत्वाच्या पाठिशी आपण धावतो आहोत. त्या धावण्यात आपल्या माणसांच्या भावभावनांचा विचार करत नाही. जेव्हा आपल्याला सारं हवं ते मिळालेलं असतं तेव्हा ही प्रेमळ माणसं मात्र आपल्याजवळ नसतात. यामुळं आलेलं एकाकीपण आणि त्या एकाकीपणाची विषण्णता कवितेतून व्यक्त करण्यात आलेली आहे.

**कळलंच नाही**
**तू कधी माझा बाप झालास**
**अन् मी कधी तुझी आई झाले?**

या गृहप्रवेश या कवितेतल्या ओळी पतीपत्नी या नात्यातील समृद्धता दर्शवतात. खरंच लग्नाआधी वेगळं असणारे दोन जीव पुन्हा एकत्र येतात, एकच होऊन जातात हे तादात्म्य खूप म्हणजे खूपच अद्भुत असे असते. सहजीवनात आपण एकमेकांचे आई व वडील होणे म्हणजे निरपेक्ष व निरातीशय प्रेम असणे होय. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात पत्नीला आईचा दर्जा दिलेला आहे आणि स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळची माता असते असं आपण नेहमी म्हणत असतो. हाच धागा कवयित्रीने आपल्या गृहप्रवेश या कवितेत साधला आहे.

**दुनियात राहणं मंजी**
**नशिबात नुस्ता भोग**
**कुटं रोजच दिवाळी**
**आमी उजेडाला म्हाग**

कवितेतील या ओळी समाजातील गरीब-श्रीमंतांच्या वाढत्या दरीवर भाष्य करणाऱ्या आहेत. कवयित्री श्रीमंतांच्या श्रीमंतीबद्दल तक्रार करत नाहीत पण समाजात एकीकडे दररोज दिवाळी आहे तर दुसरीकडे मूलभूत गरजा भागविण्यासाठीही लोकांना संघर्ष करावा लागतो आहे. त्याबद्दल त्या देवाच्याच न्यायबुद्धीवर आसूड ओढताना दिसतात. समाजातील ही वाढती आर्थिक विषमता संवेदनशील मनाच्या कवयित्रीला व्यथित करते आहे.

**तुझा आब राखण्यासाठी**
**मी स्वतःला उंबऱ्याआड कोंडलं,**
**माहेर तर कधीच सुटलं होतं**
**बाहेरच्या जगाला मी स्वतःच सोडलं**

या कवितेच्या ओळी समस्त स्त्री जीवनाची कहाणी सांगणाऱ्या आहेत. कितीतरी स्त्रियांनी आपल्या सासरच्या सुखासाठी माहेर तोडलं आहे. बाहेरच्या जगाची नातं तोडलं आहे. गळ्यात मंगळसूत्र, पायात जोडवी, भांगात बिंदी ही सारी बंधनं स्त्रीलाच का? बरं हे सारे आम्ही सौभाग्यालंकार म्हणून मिरवतोही पण ज्यांच्यासाठी हे सारं करतो त्याला याच काहीच नसतं. घरंदाजपणाच्या, खोट्या प्रतिष्ठेच्या नावावर उंबऱ्याआड कोंडून जीवन व्यथीत करणाऱ्या समस्त महिलांचे हे वास्तव कवयित्रीने खूप सशक्तपणे मांडले आहे.

**कविता म्हणजे भावनांचा गुंता**
**हलके हलके सोडवणं**
**मनाचा विस्तीर्ण पट जगासमोर**
**अलगद अलगद उलगडणं**

अशी कवितेची साधी सोपी व्याख्या कवयित्रींनी केलेली आहे . आपल्या मनातील विविध भावभावनांचा गुंता हलकं हलकं सोडवणे व आपल्या मनाचा विस्तीर्ण पट जगासमोर मांडणे म्हणजे कविता असं ताई म्हणतात.

संपूर्ण कविता अशाच आशयसंपन्न आहेत. साधे सोपे शब्द, दैनंदिन व्यवहारातील उपमा ही या कवितेची बलस्थान आहेत. उगाच शब्दांचा बुजबुजाट नाही की उपमा अलंकारांची ओढाताण नाही. स्त्री व तिच्या विविध भावभावनांची, तिच्या अंतरंगात सुरु असणाऱ्या कोलहलाची, स्वप्न-दुःख व आनंद यांच्या स्त्री दृष्टिकोनातून असणाऱ्या व्याख्येची जाणीव कवितासंग्रहातून वाचकांना होते. स्त्रीविश्व उलगडून दाखवणारा कवितासंग्रह म्हणून याकडे पाहिलं जाईल यात शंकाच नाही.

■ **ऋषिकेश गंगाधरराव देशमुख**
मु. पो. शिळवणी ता. देगलूर
जि. नांदेड ४३१७४१
९९२३०४५५५०

# डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत भारत आणि विषमतेची वास्तविकता



**असा कसा देवा तू हा धर्म निर्मियेला।**
**गरिबाची दुःखीताची दया नाही रे तुला।।**
**तुझ्या देशामध्ये देवा बा ही शिवाशिव?**
**कुणी श्रेष्ठ, कुणी नीच का हा भेदभाव?**
**याला माणुसकी धर्म नावाचा एकच पर्याय!**

या ओळी पुन्हा एकदा आठवणी करून जातात की, खरंच आपल्या देशातील विषमता पूर्णपणे नष्ट झाली का? आज जर आपण विचार केला तर सद्यस्थितीत राजकीय, सामाजिक व आर्थिक विषमतेचं जाळं सर्वत्र पसरलेलं दिसून येत आहे. म्हणून आज आपल्याला विषमता दूर करायची असेल तर आपल्याला आपल्या प्राचीन इतिहासाची दखल घेणे गरजेचं वाटते. पूर्वी राजेशाही व धार्मिक सत्तेचा प्रमुख हा राजा असायचा. सम्राट अशोकपासून तर अकबरापर्यंत आणि सम्राट हर्षवर्धनापासून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे, रयतेचे खरे राजा छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत युद्धापेक्षा लोककल्याणावर भर दिला. त्या काळामध्ये राजा कोणत्याही जाती धर्माचा असला तरी प्रजा आनंदाने राहत असे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची ओळख जगात झाली. जगाच्या पाठीवर अहिंसक आणि सहिष्णू संस्कृती म्हणून आपली ओळख झाली. मध्ययुगीन कालखंडाचा विचार केला तर या कालखंडात विषमतेने आपले रौद्र रूप धारण केले. भारतीय चातुर्वण आणि वतनी व जातीय व्यवस्थेतून निर्माण झालेली विषमता भारतात येणाऱ्या परकीय आक्रमणाना वेळोवेळी सोयीची झाली. सारा समाज या वर्ण व्यवस्थेत होरपळून निघाला. अनेक युगांपूर्वी क्रूर शक्तींना जाळून काढण्यासाठी सुलक्षणी सुदर्शन चक्राची निर्मिती झाली होती. भगवान श्रीकृष्णाला सत्याचं, न्यायचं व धर्माचं रक्षण करण्यासाठी ते मिळालं होतं. हेच समतारूपी सुदर्शन चक्र समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी, पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून, गुलामगिरीपासून मुक्तता करण्यासाठी अनेक महात्म्यांनी वापरले. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत अनेक संतांनी आध्यात्मिक व ईश्वरभक्तीच्या मार्गांनी समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. भटभिक्षूकांच्या लबाड्या, मद्यपानाचे, विद्यार्जनाचे महत्त्व, अभंग, ओवी, पोवाडा,आरती, कटाव किर्तनातून लोकांना लोकजागृतीचे व समतेचे धडे शिकविले. तरीही आपल्या देशातील विषमतेची झळ कमी झाली नाही. विषमतेच्या या विषारी नागाला ठेचण्यासाठी पुन्हा महापुरुषचा जन्म झाला. १७८७ च्या प्लासीच्या युद्धाने ब्रिटिशांनी राजकीय सत्तेचा पाया रोवला आणि समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तनाला सुरूवात झाली. दळणवळणाच्या सोयी, शिक्षण, समाजसुधारणा विषयक कायदे, निर्माण झाले. छापखाने, वर्तमानपत्रे, नियतकालिके व ग्रंथनिर्मितीला सुरुवात झाली. त्यामुळे वैचारिक मंथनाला चालना मिळून स्वधर्म, रुढीपरंपरा, मानवी हक्क व अधिकार, शोषण याची जाणीव होऊ लागली. आधुनिक पिढीतील बुद्धिजीवी महात्म्यांनी आपल्या देशातील विषमतेच्या या काळोख्या अंधारावर समतेचा प्रकाश टाकण्यासाठी आपले सर्व जीवन अर्पण केले.



**प्रा. वैशाली देशमुख**
रा. कुही, जि. नागपूर
✆ ७४२०८५०३७६

त्यानंतर हेच सुदर्शन चक्र देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, क्षेत्रात कार्य करणारे आधुनिक भारताचे जनक अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित, इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी समाजाने लाथाडलेल्या पतितांचे पालनहार, जुलमी व ढोंगी विषमतेविरुद्ध झगडनारे आंबेडकर म्हणजे मूर्तिमंत बंड होय. 'मनुस्मृती'चे दहन, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करून आपल्या लोकांचे मनोबल व आत्मविश्वास वाढविला. दलीत समाजाला न्याय ,हक्क व अधिकार मिळवून दिला.

समाजात स्त्री विषमता दूर करण्यासाठी सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांनीही स्त्रीसमानतेचे धडे दिले. स्त्रियांना विषमतेच्या साखळदंडातून मुक्त केले.

परंतु आपण आज त्यांनी निर्माण केलेल्या समतेच्या मार्गावर चालत आहोत का? हा प्रश्न भारतातील नागरिकांनी स्व:ताला केला पाहिजे. आज आधुनिक युगात वावरत असताना एकूणच समाजातील स्त्रियांवर दिवसेंदिवस अन्याय नि अत्याचारांचा अमानुषपणाच्या छळांचा आलेख वाढताना दिसून येतो आहे त्यात विशेषतः आदिवासी, दलित महिलांवर बलात्कार होत आहे. 'फूलनदेवी' व 'खैरलांजी' प्रकरण म्हणजे त्याचे जिवंत उदाहरण होय.

जातीच्या नावावर तरुणांच्या मनात विद्रोहाची भावना व हिंदू, मुस्लिम यात दाह पसरविणारे सैतानी राक्षस समाजात आतंक पसरवीत आहेत. जातीवार धार्मिकवाद, आरक्षणांच्या मागण्या, स्त्री शोषण यामुळे देशाची दयनीय स्थिती होताना दिसत आहे; परंतु अशा वातावरणात आपण काय करीत आहोत? हा प्रश्न येतो.

या माझ्या बांधवानो, अखिल मानवजातीनो, धर्म मानू एकतेचा मंत्र देऊनी प्रेमाचा, जातीय सलोखा निर्मुया! असा प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रेमाने, शांतीने आणि ऐकतेच्या भावनेने सामाजिक प्रश्न सोडवायला पाहिजे. महिलांनी मी अबला नसून सबला आहे, हे मानणे आज गरजेचे आहे. शनिमंदिरात प्रवेश करनारी तृप्ती देसाई, हाजिअली दर्ग्यात प्रवेशासाठी लढा देणारी नूरजहाँ लिहाज यांचे आदर्श समोर ठेऊन देशातील विषमता व आपले आधिकार मिळवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. तर तरुणांनी धर्म, वर्ण आणि जातीवाद न करता देशातील संस्कृतीला जपले तरच निर्माण झालेल्या अशांतीचे शांतीत रुपांतर होईल. देशातील विविधतेवरच देशाची प्रगती व अखंडता आवलंबून आहे. म्हणून आपण आपापसातील भेद विसरून एक होऊया व जगात शांती नांदवूया! असा मंत्र संपूर्ण मानव जातीने जपला पाहिजे.

## 'साहित्य चपराक'चा दत्त जयंती विशेषांक



धर्म आणि अध्यात्म हा तर आपल्या संस्कृतीचा पायाच. तो मजबूत असल्यामुळेच आपल्या राष्ट्राची नीतिमत्ता टिकून आहे. आपल्या संस्कृतीत गुरूपरंपरेला अलौकिक महत्त्व आहे. येथील दत्तसंप्रदायाने ही परंपरा टिकवून ठेवली आहे. अवतार सातत्य हे दत्त संप्रदायाचे अनोखे वैशिष्ट्य! आजच्या जगात लाखो भक्तांना भिऊ नकोस, मी तुझ्या पाठिशी आहे' असा मानसिक आधार देऊन भक्तांना सक्षम करण्यात या परंपरेतील संतांनी मोठे योगदान दिले आहे. त्यामुळेच साहित्य चपराक' मासिकाचा डिसेंबर २०१६चा अंक दत्त जयंती विशेषांक म्हणून प्रकाशित करीत आहोत. या अंकाचे अतिथी संपादक आहेत, कर्दळीवन' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक आणि साहित्य सेतू' संस्थेचे अध्यक्ष प्रा. क्षितिज पाटुकले.

या अंकात दत्त संप्रदायातील अधिकारी आणि मान्यवर लेखकांचे साहित्य असल्याने तो संग्राह्य आणि तितकाच उपयुक्त झाला आहे. मुख्य म्हणजे भारताच्या कानाकोपऱ्यातील अपरिचित परंतु दैवी अनुभूती देणाऱ्या दत्त स्थानांची संपूर्ण माहिती, तेथील पत्ते, संपर्क क्रमांक, भक्तनिवास, भोजन, पारायणासह इतर सुविधांची माहिती असणारा विशेष विभाग हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. दत्त क्षेत्रांची अनुभूती घेण्यासाठी हा अंक अवश्य वाचा.

**अंक नोंदणीसाठी संपर्क :**
'चपराक प्रकाशन', पुणे ०२०-२४४६०९०९
या अंकाचे मूल्य - केवळ ४० रुपये
**सर्व विशेषांकासह वार्षिक वर्गणी - ५००**
ऑनलाईन पैसे भरून सभासद होण्यासाठी या वेबसाईटला अवश्य भेट द्या - www.chaprak.com



# सहा डिसेंबर

***मी*** मुंबईत जेव्हा रूजू झाले तेव्हाची घटना. मी माझ्या कार्यालयातील स्त्री सहकाऱ्याला म्हटलं, ''मला जरा दादरला पुस्तक घ्यायला जायचं आहे. जरा व्यवस्थित पत्ता सांगशील का?'' त्यावर ती पटकन म्हणाली, ''मॅडम, तुम्हाला पत्ता सांगते; पण तीन–चार दिवस तुम्ही काही दादरला जाऊ नका. कोणी एखादी गोष्ट करू नका म्हटलं की, आपल्याला आधी त्याचं कारण जाणून घ्यावसंच वाटतं. मानवी स्वभावच आहे तो. स्वाभाविकपणे मी ही पटकन विचारले, ''का? आता का नाही जायचं.'' एव्हढी साधी बाब यांना माहीत नाही असा भाव चेहऱ्यावर आणत म्हणाली, ''अहो मॅडम, ६ डिसेंबर जवळ आला आहे ना! दादरला ६ डिसेंबरला गर्दीचा महापूर असतो आणि त्याच्या आधीही दोन–तीन दिवस खूप गर्दी असते.

नेमके दादरला नंतर मला रूजू व्हावे लागले आणि 'महानिर्वाण' दिनी लोकांची भावना जाणून घेता आली.



दादर–मुंबई येथे भारतरत्न आणि भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाधीस्थळ आहे. ६ डिसेंबर २०१६ रोजी बाबासाहेबांचा ६१ वा महानिर्वाण दिवस आहे. डॉ. बाबासाहेबांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यांचे अनुयायी ६ डिसेंबर हा दिवस महापरिनिर्वाण दिन म्हणून मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे एकमेव महापुरूष आहेत की ज्यांच्या मृत्यूला महापरिनिर्वाण दिन म्हणतात. डॉ. बाबासाहेबांनी स्वत:ला कधी हृदयसम्राट म्हणवून घेतले नाही; पण दलित पिडीत जनतेचे ते हृदयसम्राट आहेत. अजूनही त्यांच्या महापरिनिर्वाण दिनाची आठवण ठेवून लोक प्रचंड संख्येने दादरच्या चैतन्यभूमीवर येतात.

देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक येतात. बाबासाहेबांच्या वरील श्रद्धेने येतात. फूल, हार, मेणबत्ती पेटवून श्रद्धांजली अर्पण करतात.

इथे येणाऱ्या गर्दीचे मोजमापच करताय येत नाही. 'गर्दीचा महापूर' असंच म्हणता येईल. पण गर्दीचं वैशिष्ट्य म्हणजे इतकी गर्दी असूनही गोंगाट नाही, आवाज नाही, नारेबाजी नाही, कुठे तू–तू–मै–मै नाही. सर्व येणारे अनुयायी शुभ्र वस्त्रामध्ये येतात व शिस्त पाळतात. शिस्तबद्ध रांगेत उभे राहून 'चैतन्यभूमी'वर जातात. रांगा मैलोन मैल; पण कुठेही गोंधळ नाही, घाई नाही, सारा परीसर शुभ्रवस्त्रांकीत होऊन जातो. शिवाजी पार्कला बऱ्याच लोकांचा मुक्काम असतो.

समाजात चार–पाच माणसे ऐकत्र आली तरी आवाज सुरू होतो. समूह एकत्र आले की नारेबाजी होते; पण ह्या गर्दीचं सारंच अद्भुत म्हणूनच मला वाटते ही शांतीयात्रा!

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या दोन–तीन दिवस आधीपासूनच परिसर गजबजून जातो.

बाबासाहेबांचं जीवनचरित्र वाचलं की, त्यांचं श्रेष्ठत्व पटत जातं आणि त्यांच्याविषयी असलेला आदर वाढतच जातो.




१४ एप्रिल १९९१ ला बाबासाहेबांचा जन्म रामजी सकपाल व भीमाबाई बुरवादकर यांच्या पोटी झाला. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. शाळेत असताना त्यांचे एक शिक्षक जे देशस्थ ब्राह्मण – महादेव आंबेडकर. जे आंबावडे गावचे होते. त्यांचा बाबासाहेबांवर विशेष स्नेह होता. त्यामुळे त्यांनी सकपाळ नावाऐवजी आंबेडकर नाव लावण्यास सुरूवात केली. त्यांच्यावर गौतम बुद्ध, महात्मा फुले, संत कबीर यांचा प्रभाव होतां. बी.ए., एम.ए., पीएचडी ह्या पदव्या घेतल्या. अनेक पुस्तके लिहिली. उदा. माझी आत्मकथा, हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान, दलितांचे शिक्षण इत्यादी. मनुस्मृती ह्या ग्रंथामुळे दलितांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत हे जाणवल्यामुळे २५ डिसेंबर १९२७ रोजी त्या ग्रंथाचे समारंभपूर्वक जाहीरपणे दहन केलं. कनिष्ठ जातीतील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून 'बहिष्कृत हितकारिणी संघटने'ची स्थापना केली. दलितांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून दलित शिक्षणसंस्थेची स्थापना केली. अस्पृश्यांना व निम्न मध्यमवर्गियांना उच्च शिक्षण मिळवे यासाठी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली.

स्त्रियांसाठीही अनेक चांगले निर्णय घेतले. महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रभाव बाबासाहेबांच्यावर पडला होता. स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून पदभार घेतल्यानंतर स्त्रियांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. उदाहरणार्थ खाणकामगार असलेल्या स्त्रीला पुरूष कामगाराइतकीच मजुरी, प्रसुती भत्ता, किरकोळ रजा, नुकसान झाल्यास नुकसान भरपाई, निवृत्ती वेतन. कायसा मंत्री झाल्यावर हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव मांडला. अशी अनेक समाजोपयोगी त्यांनी निर्णय घेतले.

बहुजन समाजातील अनेकजण प्रथम भेटल्यावर जयभीम म्हणतात व एकमेकांना अभिवादन करतात. या शब्दाची सुरूवात झाली ती खूप वेगळ्या पद्धतीने. हरदास लक्ष्मणराव नगराळे उर्फ बाबू हरदास हे 'जय भीम' या घोषणेचे जनक आहेत. हरदास बाबूंनी पाहिलेकी रस्त्यात भेटल्यावर मुस्लीम बांधव एकमेकांना अस्सलामे अलेकुम म्हणतात तर उत्तरादाखल 'अलेकुम सलाम' करतात. तेव्हा त्यांनी विचार केला की आपण कार्यकर्ते भेटलो तर आपण काय म्हणायला हवं? त्यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितलं की मी 'जय भीम' म्हणेन तुम्ही उत्तरादाखल बलभीम म्हणा. हळूहळू त्यातील बलभीमचे प्रचलन बंद झालं; पण जयभीम अजूनही म्हटलं जातं. भेटल्यावर अभिवादन 'जय भीम'नेच होतं! नंतर खुद्द डॉ. बाबासाहेबही आपल्या पत्रात जयभीम लिहू लागले. वामनराम कर्डकांनी सार्थपणे लिहिले आहे –

उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे
काल कवडीमोल जिणे, वामनाचे होते
आज जुडे जगताशी, प्रेमाचे नाते
बुद्धाकडे जग हे वळे, भीमा तुझ्यामुळे...

माणसाला माणूस म्हणून जगण्याचं बळ देणाऱ्या, 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा'चा नारा देऊन अन्यायाविरूद्ध लढण्याचं बळ देणाऱ्या महामानवास माझेही कोटी कोटी प्रणाम!

# सत्य

***आयुष्यभर*** माणूस झगडतो, शिकतो, पैसे कमवतो. प्रसंगी खोटंनाटं वागतो, कुणाला फसवतो. कधी स्वतःला फसवतो. बघा आपण अनेक वेळा स्वतःलाच फसवत असतो. काही तरी समजूत करून घेत असतो; पण हे सगळंच खोटं असतं. असत्य असतं. सत्य फक्त एकच संत, सज्जन, साधू, महात्मे, तत्त्ववेत्ते सांगतात. सत्य फक्त एकच आणि ते म्हणजे मृत्यू. मृत्यू हाच सत्य असतो आणि त्याला पर्याय नाही. ज्याला सगळ्यांनाच सामोरं जावं लागणार आहे पण त्याची कुणालाच कल्पना नाही असा मृत्यू... जो सगळेच संपवतो. राग, लोभ, द्वेष, प्रेम सगळंच संपवून टाकतो तो मृत्यूच फक्त सत्य असतो.

मृत्यू जरी सत्य असला तरी सत्याला मरण नसतं. सत्य बोलणारा माणूस अप्रिय वाटत असला तरी कालांतराने त्याची महती समजते. सत्य नेहमी कटू वाटत असलं तरी ते स्वीकारावंच लागतं. सत्याचा वाली परमेश्वर म्हणतात तेही खोटं नाही. कोर्टात सत्य सांगण्यासाठी शपथ घ्यावी लागते तरीही शपथा घेऊन सत्य बोलणारे किती असतात? आपल्या सत्य/असत्य बोलण्याने एखाद्याचा जीव वाचणार असतो वा एखादा हकनाक बळी जाणार असतो. ह्याचा कुणी विचार करतं का? सत्य बोलणाऱ्याचं कुणी कधी नुकसान करीत नसतं, खरं बोलणाऱ्याला आठवणीत काही ठेवायची गरज नसते. सत्य लपवण्याची वेळ कधीच येत नसते. जेव्हा तशी वेळ येते तेव्हा आपण चुकीच्या मार्गाने गेलेलो असतो.

खरं आणि सत्य यातही थोडासा फरक आहे. खरं बोलताना मनाची समजूत काढून थोडसं खोटं दडपलं तरी चालतं मात्र सत्य हे त्रिकाल बाधित सत्य असतं. खरं पडताळून पाहता येत नाही, सत्य पडताळून पाहता येतं. काही नियमांआधारे निष्कर्ष काढता येतात आणि सत्य पडताळून पाहता येते.




डोळ्याने दिसतं ते सत्य असतं. कानाने ऐकतो ते सत्य असेलच असे नाही. सध्याच्या नाटकी विश्वात वावरताना मात्र सत्य बोलून चालत नाही. सध्याच्या नाटकी विश्वात वावरताना मात्र सत्य बोलून चालत नाही. दोन बायकासुद्धा भेटल्यानंतर, काय सुंदर आहे गं तुझी साडी... म्हणून गळ्यात पडतात (एकमेकींच्या) प्रत्यक्षात ती साडी अतिशय साधारण असते. असं तीच बाई तिसरीशी बोलताना सांगते अथवा अगं असलीच साडी आमच्या मोलकरणीला मी दिली दीडशे रुपयांना... ही सातशे सांगतेय असं कुत्सित हसून सांगते. त्यातलं सत्य फक्त दुकानदारालाच माहीत असते.

पूर्वीच्या काळी सत्यप्रिय राजे होते. राजा हरिश्चंद्र सत्यवचनी होता. श्रीराम सत्यवचनी होते. पुढे असत्याला सत्य मानण्याची पद्धत आली. कोण खरं आणि कोण खोटं हेच समजेनासं झालं. सत्य बोलणाऱ्याचा तोटा होऊ लागला. असत्य वागणाऱ्याचा फायदा होऊ लागला. सत्यवान सवित्रीच्या जमान्यात सत्यवानाचे प्राण सावित्रीच्या निष्ठेने आणि सत्यतेने वाचले. आजच्या जमान्यात अशा निष्ठाही राहिल्या नाहीत आणि सत्यतेची चाडही राहिली नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी आईवडिलांशी खोटं बोलणारी मुलं आहेत. तर मुलाशी खोटं बोलणारे आईबापही आहेत. बायकांना असत्य सांगून गुंगारा देणारे पुरुष आहेत तर नवऱ्याला सत्य न कळण्यासाठी असत्याच्या मार्गाला जाणाऱ्या बायका आहेत.

आईचं प्रेम मात्र नेहमीच सत्य असतं. आई प्रसंगी मरण पत्करेल पण असत्य बोलणार नाही. मुक्या प्राण्यांची आपल्या बद्दलची आपुलकी सत्य असते. खोट प्रेम फक्त माणसंच करू शकतात.

महात्मा गांधींचे सत्याचे प्रयोग सर्वांनाच माहिती आहेत. खोटं बोलल्याबद्दल त्यांनी स्वतःला शिक्षा करून घेतली होती. सत्य वागताना स्वतःच्या मुलाचा तोटा होणार होता, त्याची इच्छा असूनही त्याची परदेशात जाण्याची संधी जाणार होती. महात्माजी तरीही सत्यच बोलले... स्वतःचा फायदा बघितला नाही म्हणून लोक त्यांना हसले; पण आपण त्यांचाप्रमाणे वागू शकतो का? सत्य सूर्याच्या किरणांइतकं स्वच्छ असतं तर चंद्राच्या प्रकाशासारखं शीतल असतं. म्हणूनच सत्य बोलणाऱ्याच्या मनाला कधी कुणाला फसवण्याची टोचणी लागत नाही.

# प्रामाणिक जावेद



***तातडीने*** हॉस्पिटलला जायचे होते म्हणून मी मोबाईलवरचे उबेर कॅब साठीचे ॲप चालू केले. कॅबसाठी रिक्वेस्ट टाकली. दोन मिनिटातच मोबाईलवर कॅबचे लोकेशन दिसले. कॅबचा नंबर ड्रायव्हरचे नाव व मोबाईल नंबरही मिळाला. मी त्याला फोन करणारच होतो पण ड्रायव्हरनेच मला फोन करून माहिती घेतली आणि पाच मिनिटात मी उभा होतो तेथे नवी कोरी कॅब मला शोधत येवून माझ्यासमोर उभी राहिली! कॅब ड्रायव्हरचे नाव जावेद होते. मी गाडीत बसलो आणि माझे जायचे ठिकाण लिहिले. कॅब मला घेवून निघालीही! एरवी रिक्षावाल्या साहेबांना करावी लागणारी विनवणी नाही की भाड्यासाठी घासाघिस नाही! सगळं अगदी सिस्टिमॅटीक झालंय या ॲपवर आधारित कॅब सेवेमुळे! तर माझा कॅबचा प्रवास सुरू झाला.



प्रल्हाद दुधाळ
✆ ९४२३०१२०२०

माझी आपली चौकशी सुरू झाली...

''तुमचे नाव जावेद ना!''

''हो सर.''

''गाडी स्वत:ची का?''

''हो सर, आठवडाच झालाय घेऊन!''

''किती ट्रीप मारायच्या याचं काही बंधन असतं का तुम्हाला?''

''नाही तसं काही नाही, आपल्याला वाटेल तेव्हढा धंदा करता येतो!''

आता जावेद मोकळेपणाने बोलायला लागला. त्याचे बीडजवळ असलेले गाव. तिकडचा दुष्काळ, लोकांचे हालापेष्टातले जीवन. त्याने वयाच्या दहाव्या वर्षापासून ट्रकवर क्लिनर म्हणून सुरू केलेले काम. आत्तापर्यंत केलेले कष्ट आणि त्या मेहनतीवर आज त्याच्याकडे आलेली ही गाडी! अगदी अभिमानाने त्याने त्याच्या आयुष्याचा प्रवास मला कथन केला. माझे उतरायचे ठिकाण आले. मी त्याच्याकडे झालेल्या भाड्याची रक्कम विचारली. जावेदने मोबाईलवर बघून सांगितले.

''एकशे बावीस रुपये सर.''

अपेक्षेपेक्षा खूपच कमी भाडे झाले होते! मी साधारण पंचवीस किलोमिटर प्रवास केला होता त्यामुळे परत एकदा खात्री केली. उबेर कंपनीची प्रमोशनल ट्रीप असल्याने एकशे पंचाहत्तर रूपये डिस्काउंट मिळाला होता. मी त्याला एकशे बावीस रूपये दिले आणि माझ्या कामाला लागलो. तोही निरोप घेऊन निघाला.

पंधरा मिनिटेच झाली असतील माझा मोबाईल वाजला.

''हॅलो...''

''हॅलो, मी जावेद, आत्ता तुम्हाला कॅबमधून सोडलं ना तो!''

''ओळखले, बोला.''

''सर, सॉरी पण भाडे घेताना थोडी गडबड झाली. दोनशे बत्तीस घ्यायला पाहिजे पण मी चुकून एकशे बावीस घेतले.''

''आता कुठे आहात तुम्ही?''

''इथेच समोर आहे. सर माफ करा तुम्हाला त्रास देतोय!''

''ठिक आहे, घेऊन जा तुमचे वरचे पैसे, आलोच मी बाहेर.''

मी बाहेर आलो. जावेद माझी वाटच पाहत होता. त्याला एकशे दहा रुपये दिले तर त्याने शंभरच घेतले. म्हणाला...

''सर शंभरच द्या, तुम्ही लगेच तयार झाला वरचे पैसे द्यायला, नाही तर मला भुर्दंड बसला असता.''

शंभर रूपये घेऊन जावेद गेला मी पुन्हा माझ्या कामाला लागलो.

संध्याकाळी परत जावेदचा फोन आला.

''सर, मी जावेद, दुपारी माझी बघण्यात काहीतरी गडबड झाली. तुमचे आधीचेच बील बरोबर होते. मी कंपनीकडे चौकशी केली. तुमचे बील एकशे बावीसच आहे. आता तुमचे शंभर रूपये माझ्याकडे जास्त आले. तुम्ही कुठे भेटू शकाल?''

''ठिक आहे, राहू द्या तुमच्याकडे'' मी त्या विषयावर पडदा पाडायला बघत होतो.

''नाही सर, उद्या मी तुम्हाला गाडीत घेतले त्या ऑफिसात मी येतो आणि तुमचे पैसे देतो.''

''ठिक आहे'' म्हणून मी विषय संपवला.

मधे दोन दिवस गेले. मी तो प्रसंग विसरूनही गेलो होतो.

तिसऱ्या दिवशी जावेद ऑफिसच्या गेटवर हजर! मला त्याने गेटवर बोलावले आणि माझे शंभर रूपये बळे बळे मला परत केले! खरं तर त्याच्याबरोबर एक सेल्फी घ्यायला हवा होता पण त्यावेळी सुचले नाही!

एक रहस्य मात्र समजले...

या प्रामाणिकपणामुळेच वयाच्या दहाव्या वर्षी कुणाच्यातरी ट्रकवर काम करणारा एक जावेद नावाचा क्लिनर आज स्वत:ची कॅब घेऊन स्वाभिमानाने आपला व्यवसाय करत आहे!

## अत्यंत महत्त्वाचे

**तुम्ही १८ ते ५५ या वयोगटातील स्त्री किंवा पुरुष आहात का?**

**कृपया त्वरित इकडे लक्ष द्या.**

**असल्यास तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे!**

**केंद्र सरकारने तुमच्यासाठी एक पेन्शन योजना तयार केली आहे.
वय वर्ष साठ नंतर जिवंत असेपर्यंत तुम्हाला पेन्शन मिळणार आहे.**

- त्यामध्ये तुम्ही त्वरित पेन्शनखाते उघडणे गरजेचे आहे.
- १८ ते ५५ वयोगटातील स्त्री पुरुषांनी त्वरित पेन्शन नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

**त्वरित भेटा... पेन्शन गुरु : प्रा. क्षितिज पाटुकले**

**पेन्शन गुरु तुमच्यासाठी घेवून आले आहेत पेन्शन नियोजनाचे तंत्र आणि मंत्र, ज्यामध्ये आहे केंद्रसरकारच्या पेन्शन योजनेची संपूर्ण माहिती, मार्गदर्शन, सल्ला, सहाय्य, तुमच्या वयानुसार आर्थीक आणि गुंतवणूक नियोजनासाठी मार्गदर्शन... आणखी बरेच काही**

**संपूर्ण माहितीसाठी पहा : वेबसाईट : www.pensionguru.in**

**आणि अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा –**

**पेन्शनगुरू द्वारा इंश्युरन्स ॲकॅडमी, ६२२, जानकी रघूनाथ, पुलाचीवाडी, झेड ब्रिजजवळ, डेक्कन जिमखाना, पुणे–४**

**वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ७.३० (रविवारी सुट्टी)**

**मोबाईल : ९४०३७६७७५४ / ०२०–२५५३४६०१**

ईमेल :– mail@pensionguru.in

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस, सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे–४११ ०४१ येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com

अभिप्राय

# 'तत्त्वाचे तुळशी वृंदावन'




**घनश्यामजी,** तुमच्या वयाचा विचार करता, तुम्ही पत्रकारिता व साहित्याचा जो प्रवास केलेला आहे तो फार दमदार आहे, हे 'चपराक'चा २०१६ चा दिवाळी अंक वाचल्यानंतर समजते.

'साहित्यिक वैभवाचे शाश्वत सत्य' हे संपादकीय म्हणजे आपल्या दमदार साहित्य वाटचालीची पावती. तुम्ही पत्रकारितेला चळवळीचे, सामाजिक बांधिलकीचे स्वरूप दिले; तेही सर्वच क्षेत्रात चंगळवाद बोकाळलेला असताना! तुम्ही एक वर्षापूर्वी संगमनेरात 'नाम' संस्थेला पत्रकार निधी देत असलेल्या कार्यक्रमाला आलात; तुमचे जिवाभावाचे सवंगडी घेऊन! तुम्ही दिवसभर नाश्त्यावर होता. रात्री आमच्या उत्साही पत्रकार मित्रांनी प्रेमाने बिर्याणी केली. तुम्ही ती खायलाही तयार नव्हता. का? तर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कार्यक्रमाला जायचे व्रत म्हणून! अन् तिथे बिर्याणीसारख्या सामीष पदार्थावर ताव मारायचा, हे तुमच्या पत्रकारात खोलवर दडून बसलेल्या, व्रतस्थ माणसाला सहन होत नव्हते. त्याचवेळी मला मनापासून वाटले, चंगळवादी जमान्यातही कुठेतरी 'तत्त्वाचे तुळशी वृंदावन' उभे आहे.

घनश्यामजी, १३ व्या वर्षी सुरू झालेला हा आपला प्रवास नक्कीच भविष्य घडविणारा इतिहास ठरेल. तुम्ही अतिशय प्रेमाची, जीवाची माणसे जोडली. वयाच्या १८व्या वर्षी संपादक झालेला माणूस, तिशीच्या आत आपल्या साप्ताहिकाला पाच लाख वाचक जोडतो, अठरा हजार सभासद जमवतो! मराठी भाषा जिवंत रहावी, तिची वृद्धी, विस्तार व्हावा यासाठी महाराष्ट्राबाहेर पाच राज्यात 'चपराक' साप्ताहिक, मासिक पाठवून आपली सामाजिक बांधिलकी अधिक घट्ट करतो, हे 'दोन घडीचा डाव' हे आपल्या महेश मांगले यांच्या लेखातून समजले. हैद्राबादला जाऊन तिथल्या मराठी भाषिकांना, मराठी साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांना भेटणे, उस्मानिया विद्यापीठातील ग्रंथालयाला भेट देणे हा सगळाच आपला प्रवास हा ऐतिहासिक आहे. तुम्ही नाही, तुमचे कार्य बोलतेय तुमच्या दिवाळी अंकातून!

घनश्यामजी, आपण अतिशय लहान वयात फार मोठी माणसे जोडली. गुणी मित्र मिळवले. हे सर्वांनाच जमते असे नाही बरं! तुमच्या हातून भविष्यात फार मोठे कार्य होणार आहे. 'देवाघरचे ज्ञात कुणाला!' मी याच्यावर काय लिहावे? आपल्या या बांधिलकीचा प्रवास अनेकांना सामाजिक भान शिकविणारा आहे. तुमचा 'संस्कृती' दिवाळी अंकातील 'वृत्तपत्र विक्रेता ते संपादक व्हाया बालपण' हा लेखही वाचला. त्यामुळे घनश्याममधला तरुण अधिक उलगडत गेला. मी या लेखाच्या प्रतिक्रियेबद्दल त्या अंकाच्या संपादक सौ. सुनिताराजे पवार यांना फोन करून दहा-पंधरा मिनिटे गप्पा मारल्या.

मी मराठी साहित्याचा विद्यार्थी व तुमच्यासारखाच पत्रकार असल्यामुळे मी तुमच्या या वाटचालीचा अभिमान बाळगतो. हल्ली पत्रकार वाचत नाहीत तसेच प्राध्यापकदेखील अध्यापनाव्यतिरिक्त फारसे वाचत नाहीत, ही अनेक मान्यवरांची खंत आहे. या सर्वांसाठी आपला प्रवास 'दीपस्तंभा'सारखा आहे. ज्यांना जीवनात समाजासाठी काहीतरी करायचे आहे, अशीच तुमच्यासारखी झपाटलेली माणसं धडपडत असतात.

इतका मोठा दिवाळी अंक बघितल्यावर प्रश्न पडतो, हा जाहिरात अंक असावा; परंतु पानं उलटत गेलं की, किती वैविध्यपूर्ण, साहित्याने नटलेला, भरलेला हा अंक आहे हे पटते. अंकात सर्वांगीण लेख आहेत. एकसुरीपणा नाही.

घनश्यामजी, तुम्ही दैनंदिनी लिहीत असालच! नाहीतर आजपासूनच सुरू करा. तुमचं, एका बहुजन समाजाच्या मुलाचं भविष्यातलं 'आत्मकथन' हे साहित्य चळवळीतील मैलाचा दगड ठरेल. मराठवाडा ते पुणे असे संस्कृती दिवाळी अंकातील लेखातून आपले बालपन समजले. वारकरी संप्रदायाचे आपले घराणे. वडील कथा, कीर्तन व प्रवचनकार. वडिलांनी तुम्हाला जो बोध केला तो फार हृदयस्पर्शी आहे. ''असत्यावर तुटून पड. सामान्य माणसाचा आवाज हो. शब्दांनी घाव घाल. ज्ञानच आपल्याला तारेल. दुर्बलांचा आवाज हो'' या साध्या शब्दांमध्ये किती मोठे तत्त्वज्ञान सामावलेले आहे.

'चपराक'चा अंक खूप खूप चांगला झालेला आहे. खूप आवडला. मी फार लिहू शकेल. कुठेतरी थांबायला हवे म्हणून थांबतो. तुमच्या साहित्यदिंडीला माझ्यासारख्याचा हात लागला तर मीही भरून पावेल.

घनश्यामजी धन्यवाद!

■ **नंदकुमार ना. सुर्वे** (पत्रकार)
'रायगड', गोल्डनसिटी, संगमनेर, जि. अहमदनगर
९८८११५२४६१

# थेऊरचा पंचवार्षिक विकास आराखडा तयार

**लोणी काळभोर, (प्रतिनिधी) :**

अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी एक तीर्थ क्षेत्र थेऊर. या गावचा पंचवार्षिक विकास आराखडा तयार केला असून विकास आराखड्यानुसार गावातील कामे करण्यात येणार असल्याची माहिती सरपंच छायाताई हिरामण काकडे यांनी सांगितले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या वर्षामध्ये गावात अनेक विकास कामे सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने पूर्ण झाली आहेत. तर काही प्रगती पथावर आहेत. त्यात पाणी पुरवठा योजनेमध्ये एक वर्षापूर्वी पाणी पुरवठ्यातील विस्कळितपणा दूर करून थेऊर गावठाण हद्दीत पाणी पुरवठा व्यवस्थित चालू आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी थेऊर गावासाठी जल स्वराज योजनेतून पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यानुसार काम प्रगती पथावर आहे. गावात बंदिस्त गटारे व वाड्या वस्तीवरील सर्व रस्ते सिमेंटचे व डांबरीकरण करण्यात येणार आहे. स्मशानभूमी परीसर सुधारणा करण्यात येणार आहे. त्यात निवारा शेड, प्रवचनकार यांना बसण्यासाठी व्यासपीठ, प्रवेशद्वारावर लोखंडी गेट, एक पाण्याची टाकी, चेंजिग रूम, स्वच्छतागृह इत्यादी कामे पूर्ण केली जाणार आहेत. गावातील शाळेसाठी विविध माध्यमातून ३५ लाख रुपयांचा निधी जमा झाला असून शाळा दुरूस्ती व सर्व अंगनवाड्या दुरूस्तीची कामे केली जाणार आहेत. आठवडे बाजारासाठी वृक्ष लागवड करणे व्यापाऱ्यांना बसण्यासाठी आधुनिक ओटे तसेच गाळे बांधण्यात येणार आहेत.

विधान परिषदेचे आमदार जगन्नाथ शिंदे यांनी थेऊर येथील मुख्य चौकामध्ये एल.ई.डी. हाय मास्ट लाईट बसवण्यासाठी पाच लाख रूपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. तसेच आमदार अंनत गाडगीळ यांनी पाच लाख निधी देण्याचे मान्य केले आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रदीप कंद व मुख्य मंत्री कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य तीर्थ क्षेत्र विकास समितीचे सदस्य ओम प्रकाश शेटे यांच्या उपस्थिती त विविध कामाचे भूमीपूजन व उद्घाटन झाले. त्यावेळी श्री. शेटे यांनी गावाचा तीर्थ क्षेत्र 'ब' वर्गाचा दर्जा मिळवून देण्याचे मान्य केले होते. त्यानुसार शिरूर हवेलीचे आमदार बाबुराव पाचर्णे यांच्या माध्यमातून शासन दरबारी 'ब' वर्ग दर्जासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे. गावातील विकास कामे ही दर्जेदार होणार असून थेऊर गाव हे महाराष्ट्र राज्यात एक आदर्श गाव म्हणून नावारुपाला आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे सरपंच छाया ताई हिरामण काकडे यांनी सांगितले.





**संस्कृती प्रकाशन**
६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, नू. म. वी. शाळेसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४९७३४३ मो. : ९८२३०६८२९२
sanskrutiprakashan@yahoo.com I www.sanskrutiprakashan.com